पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८
पाणीपुरवठा विभाग
क्र. जशुके/पापु/१९६/२०१३
दिनांक – २६/०८/२०१३

विषय – अनधिकृत नळजोड नियमित करणे.

संदर्भ – १) इकडील आदेश क्र.पापु।जशुके।६६।१३, दि.०६।०३।२०१३.

२)मा. स्थायी समिती ठराव क्र.३८२९, दि.०६।०८।२०१३.

आदेश,

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नळजोडाच्या व्यासानुसार दंड व पाणीपट्टीची आकारणी करुन नळजोड नियमित करुन घेण्याबाबतचे आदेश उपरोक्त संदर्भीय १ अन्वये काढण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | नळजोडाचा व्यास | अनामत, दंडासह थकित पाणीपट्टीची रक्कम | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निवासी | | | | वाणिज्य | | |
| | | अनामत | दंड | पाणीपट्टी | एकूण | अनामत | दंडासह पाणीपट्टी | एकूण |
| १ | १५ मिमी | १२०० | १५०० | ४३०० | ७००० | ७००० | १८००० | २५००० |
| २ | २० मिमी | ३३०० | २००० | ७६५० | १२९५० | १३००० | ३०००० | ४३००० |
| ३ | २५ मिमी | १०००० | ३३०० | ११९५० | २५२५० | १९००० | ४५००० | ६४००० |
| ४ | ४० मिमी | २०००० | ८३०० | ३०६०० | ५८९०० | २३००० | १००००० | १२३००० |
| ५ | ५० मिमी | २५००० | १३३०० | ४७८०० | ८५८०० | २७००० | १९०००० | २१७००० |

उपरोक्त आदेशानुसार दिनांक ३० एप्रिल २०१३ ही अंतिम तारीख निश्चित करण्यात आली होती. सदर तारखेपर्यंत अनधिकृत नळजोड नियमित न केल्यास किंवा नियमित करुन घेण्यासाठी आवश्यक ते शुल्क भरुन अर्ज सादर न केल्यास, अशा नळजोडधारकांचे नळजोड तोडून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करावी, व त्यानंतर सदर दंडाच्या रकमेच्या दुप्पट रक्कम ( उदा. निवासी १५ मिमी व्यासासाठी र.रु.१४०००।-) आकारुन नळजोड नियमित केला जाईल, असा निर्णय घेण्यात आला होता.

शहरात साधारणपणे दहा हजाराच्या वर अनधिकृत नळजोड असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यापैकी सुमारे ९०० नळजोडधारकांनी सदर मोहिमेचा लाभ घेतला आहे. तथापि ३० एप्रिल २०१३ नंतर दंडाची रक्कम दुप्पट झाल्याने नागरिकांचा प्रतिसाद कमी झाला. एकूणच दंडाची रक्कम दुप्पट केल्याने नागरिकांचा प्रतिसाद मिळत नाही, असे दिसून आले आहे. तसेच एवढ्या मोठ्या संख्येच्या अनधिकृत नळजोडधारकांचे नळजोड तोडण्याची कारवाई करणे देखील अवघड आहे. याबाबत दि.२६।०६।२०१३ रोजी ऑटो क्लस्टर येथे झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार संदर्भीय आदेशातील दंडाची रक्कमच आणखी काही कालावधीसाठी (३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत ) कायम ठेवण्याचे ठरले.

त्यानुषंगाने अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी संदर्भीय आदेशातील दंडाची रक्कम दिनांक ३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत कायम ठेऊन दिनांक ३० ऑक्टोबर २०१३ पर्यंत नळजोड नियमित करुन घेण्यासाठी अर्ज न केलेल्या अनधिकृत नळजोडधारकांवर नळजोड तोडण्याची तसेच असे निवासी नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील फक्त दंडाच्या रकमेत दुपटीने ( उदा. १५ मिमी साठी र.रु.१५००।- ऐवजी र.रु.३०००।- ) वाढ करणे, व वाणिज्य नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील दंडासह पाणीपट्टीच्या रकमेत १० टक्के वाढ ( उदा. १५ मिमी साठी र.रु.१८०००।- ऐवजी र.रु.१९८००।- ) करण्यात यावी. तसेच दिनांक ३० एप्रिल २०१३ नंतर अनधिकृत नळजोड नियमित करण्यासाठी तक्त्यातील रकमेच्या दुप्पट रक्कम ग्राहकाने यापूर्वी अदा केलेली असल्यास सदरची जादाची रक्कम अशा ग्राहकाच्या पुढील पाणी बिलात समायोजित करण्यात यावी. सदरच्या प्रस्तावास मा. स्थायी समितीने ठराव क्रमांक – ३८२९, दि.०६।०८।२०१३ अन्वये मान्यता दिलेली आहे.

अशा ग्राहकांकडे पूर्वीचा पाणी मीटर असू शकतो, तो मीटर सुस्थितीत नसल्यास नवीन मीटर बसविणे तसेच मीटर नसल्यास स्वखर्चाने मीटर बसविणे आवश्यक आहे. मीटर बसविल्यानंतरच अशा ग्राहकांची नोंद मीटर क्रमांकासह संगणक प्रणालीत करण्यात यावी.

सदरची मुदतवाढ देताना खालील बाबींचा समावेश करण्यात आलेला आहे.

१) संबंधित मीटर निरीक्षकाने त्याच्या कार्यक्षेत्रातील अनधिकृत नळजोडांबाबत त्या परिसरात कार्यरत असलेल्या पाणीपुरवठा विभागाच्या कनिष्ठ अभियंता यांना रोजच्या रोज रिपोर्टींग करणे.

२)नळजोड नियमित करण्यासाठी ग्राहकाकडे मिळकतकर उतारा असल्यास त्यानुसार छाननी करण्यात यावी, परंतू मिळकतकर उतारा नसल्यास ( मिळकतीची नोंद झालेली नसल्यास ) अर्जासोबत सदर ग्राहकाच्या रहिवासाचा पत्ता दर्शविणारे कागदपत्र ( उदा. बीज बील । टेलीफोन बिल । ड्रायव्हिंग लायसन्स । पासपोर्ट । आधार कार्ड । इ.) की ज्या पत्यावर सदर ग्राहकाला पाणी बिल पोच करता येईल, एवढे कागदपत्र घेण्यांत यावे. ( एखादी बहुमजली इमारत असल्यास सदनिकांच्या मोजणीसाठी मंजूर नकाशाची प्रत किंवा त्यासाठीचा अन्य पुरावा घेणे अपेक्षित आहे). याबाबत प्रभाग कार्यालयातील नागरी सुविधा केंद्रांनाही तसे सूचित करण्यात यावे. मिळकतकर उतारा नसलेल्या पण नळजोड नियमित केलेल्या ग्राहकांची नोंद वेगळी ठेवण्यात यावी.

३) अर्जदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन किंवा अन्य काही कारणांमुळे नळजोड नियमित करण्यास अडचणी येतात अशा ग्राहकांची वेगळी यादी ( कारण नमूद करुन ) तयार करुन त्याबाबत मा. आयुक्त सो. यांच्या स्तरावर निर्णय घेणे.

जर एखाद्या ग्राहकाकडे मिळकतकराची नोंद नसल्यास सदरचे बांधकाम दिनांक ३१ मार्च २०१२ पूर्वीचे आहे की नंतरचे आहे यासाठी सध्या स्थापत्य विभागाकडून सदर बांधकामांना देण्यात आलेल्या नोटीसांचा आधार घेण्यात यावा. सदर यादीत त्या बांधकामाचा समाविष्ट असल्यास त्यांना नळजोड देऊ नये. नळजोड देताना घ्यावयाचे हमीपत्र र.रु.२००।– इतक्या रकमेच्या स्टँम्प पेपरवर घेण्यात यावे. तसेच यापुढे कोणताही नळजोड मंजूर करताना । नियमित करताना संगणक प्रणालीत सदर नळजोडास ग्राहक क्रमांक देतानाच मीटर क्रमांकाची तसेच ग्राहकाच्या मोबाईल क्रमांकाची नोंद सुध्दा घेण्यात यावी. तसेच जागेवर मीटर असल्याशिवाय प्लंबरने नळजोड देऊ नये.

सह शहर अभियंता ( पापु)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी, पुणे – १८